॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

# आचार्य श्री किशोरजी व्यास यांचा संक्षिप्त जीवन परिचय

भक्ती आणि ज्ञानाची गंगा आपल्या मधुरवाणीने सबंध भारत वर्षात नव्हे तर परदेशातसुद्धा प्रसारण करणारे पूज्य आचार्य श्री किशोरजी व्यास यांचा जन्म बेलापूर (नगर) १९५१ साली झाला. अध्ययन काशी येथे करून अवघ्या १७ व्या वर्षी आचार्य ही उपाधी प्राप्त केली. पुढील १७-१८ वर्षांच्या काळात ४०० हून अधिक ठिकाणी श्रीमद् भागवत, वाल्मिकी रामायण, ज्ञानेश्वरी, दासबोध, योगवासिष्ठ आदी ग्रंथांची प्रवचने देशविदेशात केली आहेत. हे सर्व कार्य प्रवचन करण्यापुरते मर्यादित नसून त्यांनी युवा पिढीला संस्कारक्षम, सुसंस्कृत व वेदज्ञ बनविण्यासाठी आपले जीवन ब्रह्मचारी राहून समर्पित केलेले आहे. सन १९९० मध्ये आळंदी येथे महर्षि वेदव्यास प्रतिष्ठानची स्थापना केली. पुढे दालेगाव (परभणी), खामगाव (विदर्भ), धुळे, पुष्करराज (अजमेर) येथे वेदविद्यालये स्थापन केली तसेच सांवरगाव (जालना) येथील चतुर्वेदेश्वरधाम वेद विद्यालय व जिंतुर (परभणी) व अमरावती व कलकत्ता येथेही वेदविद्यालये सुरू केली आहेत. १९९८ पासून सध्याची बालके, शारीरिक, मानसिक, नैतिक, सामाजिक व बौद्धिकदृष्ट्या सुसंस्कारित करण्यासाठी संपूर्ण भारतभर बालसंस्कार केंद्रे स्थापन केली आहेत. सध्या अनेक नवीन उपक्रमांद्वारे भारतभर व परदेशांत वेदांसंबंधी व संतसाहित्य याचा प्रचार सुरू आहे. त्यांच्या विशाल कार्यात आपणास सहभागी होण्यासाठी अनेक योजना आहेत. त्याद्वारे धर्मकार्यात आपण सहभागी होऊ शकता. या योजनांची माहिती आपणास ज्ञानयज्ञाचेवेळी उपलब्ध करून दिली जाणार आहे. चला तर आपण आपली प्रेमाची ओंजळ धर्मकार्यात समर्पित करू या!

॥ जय श्रीकृष्ण ॥